दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक १११ वा गुरूवार दि.१४ सप्टेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## आरक्षणासंदर्भात मुख्यमंत्री शिंदे यांच्या संवादाचा व्हीडीओ व्हायरल

मुंबई : मराठा आरक्षणाच्या बैठकीनंतर सह्याद्री अतिथिगृहावर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचा पत्रकार परिषद सुरू होण्यापूर्वीचा व्हीडीओ व्हायरल झाल्याने नवीन वादाला तोंड फुटले आहे.

यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामध्ये पत्रकार परिषद सुरू होण्याआधी झालेला संवाद, तिघे नेमके काय बोलले या संदर्भाचा व्हीडीओ व्हायरल झाला असून सरकार अजून एका नव्या वादात सापडले आहे.

मराठा आरक्षणासंदर्भातील सर्वपक्षीय बैठक मुंबईमध्ये घेण्यात आल्यानंतर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मात्र पत्रकार परिषदेसाठी पत्रकारांसमोर आल्यानंतर प्रश्नोत्तरे सुरू होण्याआधीच आल्या आल्या माईकसमोर शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांमध्ये झालेला संवाद समोर आला आहे. तिन्ही नेत्यांना माईक सुरू असल्याची कल्पना नसल्याचे या व्हीडीओमधून लक्षात येत आहे.

पत्रकारांसमोर आल्या आल्या मुख्यमंत्री शिंदेंनी, आपल्याला काय? बोलायचे अन् निघून जायचे, असे फडणवीस आणि अजित पवारांकडे पाहात म्हटले. पुढे मुख्यमंत्र्यांनी 'बोलून मोकळे व्हायचे' असेही म्हटले. यावर अजित पवार यांनी, 'हो यस' असा प्रतिसाद दिला. हा संवाद सुरू असतानाच देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदेंच्या कानात, 'माईक चालू आहे' असे सांगितले. त्यानंतर अजित पवारांनी माईकवर हाताने स्पर्श करून, 'ऐकू येते..' असे म्हटले.

## गुरुजी आता सरकारचे सांगकाम्या म्हणून फिरताहेत का?

मुंबई : मराठा आंदोलन थांबविण्यासाठी सरकारकडून प्रयत्न केले पाहिजेत. काल तर गुरुजींनी शिष्यांना प्रमाणपत्रच दिले आहे. सुरुवातीला शिष्यांनी गुरुजींवर विश्वास ठेवला होता. आता गुरुजी शिष्यांसाठी फिरत आहेत. संभाजी भिडे गुरुजी आता सरकारचे सांगकाम्या म्हणून फिरताहेत का? या प्रश्नाचे उत्तर काल मिळाले आहे, असा घणाघात विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी करत फडणवीस, शिंदे व अजित पवारांवर निशाणा साधला. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर घणाघात केला.



मराठा आंदोलनावरून त्यांनी म्हटले की, काल ज्या पद्धतीने पत्रकार परिषदेच्या आधीचा व्हीडीओ समोर आला त्यावरून हे सरकार किती गंभीर आहे हे लक्षात येते. या सरकारकडे काहीच काम नाही. किमान त्यांनी राज्यामध्ये सुरू असलेली विविध आंदोलने सोडविण्यासाठी तरी प्रयत्न केले पाहिजेत. शासन आपल्या दारी अन् आंदोलनाच्या मंडपादारी तरी काम केले पाहिजे, अशी अपेक्षा आहे.

विजय वडेट्टीवार यांनी संभाजी भिडे यांच्यावर देखील थेट घणाघात केला. ते म्हणाले की, काल सरकारचा सांगकाम्या म्हणून एक मास्तर म्हणा की गुरुजी थेट काम करत असल्याचे दिसून येत आहे. हे काल संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले अन् ते सिद्ध झाले. ते गुरुजी तर आता थेट अजित पवार यांच्या काळजात घुसून आले आहेत. जरांगे पाटलांना तर त्यांनी शिष्यांवर विश्वास ठेवायला लावला आहे.

सरकारी मालमत्ता विका, घर चालवा धोरण

खाजगीकरण करण्याचा या सरकारचा घाट आहे. सरकारचे धोरणच आता सरकारी मालमत्ता विका आणि आपलं घर चालवा, असे आहे. त्यामुळे तुमची सत्ता चालविण्यासाठी सरकारी पैसे वापरले जात आ-हेत, ते चालतात. मग विरोधकांनी केला तर विरोध का होतो, असा प्रश्न वडेट्टीवार यांनी उप-स्थित केला. फडणवीसांनी विरोध केला होता, आता का ते यावर बोलत नाहीत. कर्जाला शासकीय हमी देणे ही सरकारची लूट आहे. मग आता सत्ता चालविण्यासाठी साखर कारखान्यांना मदत दिली जात आहे. त्यामुळे या सरकारची भूमिका ही सोयीस्कर आणि महाराष्ट्राची दिशाभूल करणारी आहे.

## तोंडार जिल्हा परिषद शाळेतील विषबाधा प्रकरणी मुख्याध्यापकाचे निलंबन; चौकशीही होणार

लातूर, दि. १३ (जिमाका): उदगीर तालुक्यातील तोंडार येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना खिचडीतून विषबाधा प्रकरणी उदगीर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या शालेय पोषण आहारचे लेखाधिकारी यांनी भेट देवून अहवाल सादर केला आहे. याप्रकरणी या शाळे-चे प्रभारी मुख्याध्यापक रणजीत भानुदास फड यांना जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांची चौकशी केली जाणार आहे. तसेच खिचडी शिजविणारी स्वयंपाकी यांना जबाबदार धरून त्यांच्यावर पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी यांनी दिली आहे.

तोंडार येथील जिल्हा परिषद शाळेत शालेय पोषण आह-ारातील खिचडी व हरभरा उसळ खाल्ल्यामुळे ८७ पैकी १५ विद्यार्थ्यांना विषबाधेची लक्षणे दिसून आली होती. त्यांना तातडीने उदगीर येथील सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तसेच उर्वरित ७२ विद्यार्थ्यांची तालुका आरोग्य अधिकारी यांनी शाळेत जावून तपासणी करून त्यांच्यावर उपचार केले होते. उपचारानंतर सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## 'आयुष्मान भव:' मोहिमेत गावे क्षयमुक्त करावीत- अनमोल सागर

लातूर, दि. १३ (जिमाका): देशात १३ सप्टेंबर २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत 'आयुष्मान भवः' मोहीम राबविली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत गावे क्षयमुक्त करावीत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी केले. भातांगळी प्राथमिक आरोग्य केंद्रात 'आयुष्मान भवः' मोहिमेच्या जिल्हास्तरीय उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते.



आरोग्य विभागाच्या उपसंचालक डॉ. अर्चना भोसले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बेरुरे, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अर्चना पंडगे, जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी डॉ. नितीन बोडके, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. तांबारे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पाठक यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

समाजातील सर्व घटकांनी 'आयुष्मान भवः' मोहिमेत सहभागी होवून आरोग्यदायी जीवनाची सुरुवात करावी. सर्व गावांनी यात सहभागी होवून गावे क्षयरोगसारख्या आजारातून मुक्त करणेचे आ-वाहन श्री. सागर यांनी केले.

अवयवदानाची चळवळ व्यापक करणे आवश्यक असून जास्तीत जास्त ग्रामस्थांनी या मोहिमेत सहभागी व्हावे. तसेच 'आयुष्मान भवः' मोहिमेमुळे आजारांचे लवकर निदान होण्यास मदत होणार असून वेळेत सर्व आजाराचे निदान झाले तर समाज सुदृढ होण्यास मदत होईल, असे मत आरोग्य विभागाच्या उपसंचालक श्रीमती डॉ. भोसले यांनी व्यक्त केले.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. ढेले यांनी कर्करोगाबाबत मार्गदर्शन केले. सध्या कर्करोग व असंसर्गीक आजार वाढत असून त्यावर मात करण्यासाठी लवकर निदान व उपचार आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी लाभार्थ्यांना आयुष्यमान कार्ड, आभा कार्ड वितरण करण्यात आले. तसेच अवयवदान, क्षयरोग निदान, असंसर्गीक आजाराबाबत विविध जाणीव जागृती स्टॉलचे व तपासणी शिबीराचे आयोजन यावेळी करण्यात आले होते.

आयुष्यमान कार्ड पाच लाभार्थी, क्षयरोग रुग्णांना मोफत आहाराची मदत करणारे पाच निक्षय मित्र, क्षयरोग मात करणारे चॅम्पीयन यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थितांना अवयवदानाची शपथ देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. वडगावे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सुधीर बनशेळकीकर यांनी केले.

## लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळातील दोन अभियंते, एका कर्मचाऱ्याला राज्य शासनाचा पुरस्कार जाहीर

१५ सप्टेंबर रोजी मुंबई येथे होणार वितरण

लातूर, दि. १३ (जिमाका): भारतरत्न सर विश्वेश्वरय्या यांचा १५ सप्टेंबर हा जन्मदिवस दरवर्षी 'अभियंता दिन' म्हणून राज्य शासनातर्फे साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने सार्वजनिक बांधकाम विभागात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या अभियंता व कर्मचारी यांना राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतो. सन २०२२-२३ मधील उल्लेखनीय कामगिरीबद्दल ला-तूर सार्वजनिक बांधकाम विभागातील दोन अभियंते आणि एका कर्मचाऱ्याची या पुरस्कारासाठी निवड झाली असून १५ सप्टेंबर २०२३ रोजी मुंबई येथील षण्मुखानंद सभागृहात आयोजित कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण होईल.

राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये निलंगा सार्वजनिक बांधकाम विभागातील उपकार्यकारी अभियंता सुनील गोविंदराज बिराजदार आणि लातूर सार्वजनिक बांधकाम विभागातील शाखा अभियंता लोभाजी आयलुजी घटमल यांचा समावेश आहे. तसेच लातूर सार्वजनिक बांधकाम मंडळ येथील कनिष्ठ लिपिक गजानन शिवाजीराव चव्हाण यांनाही पुरस्काराने गौरविण्यात अयेणार आहे.

## बलात्कार प्रकरणातील आरोपीला तब्बल २० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा.

### लातूर जिल्ह्याच्या इतिहासातील बाललैंगिक अत्याचार प्रकरणात प्रथमतः २० वर्ष इतक्या मोठ्या सश्रम कारावासाची शिक्षा नमूद आरोपीस मा. न्यायालयाने सुनावली आहे.

लातूर :- गुन्ह्यातील आरोपी सागर बाबासाहेब उर्फ धनंजय सूर्यवंशी, वय ३२ वर्ष, राहणार निलंगा जिल्हा, लातूर जवळच्या नात्यातील अल्पवयीन मुली सोबत शारीरिक संबंध ठेवल्याप्रकरणी दोषी धरून कलम ३७६,(२), ३५४, ५०६ भादवी व बाललैंगिक अत्याचार अधिनियम कलम ६, ८ ,१२ प्रमाणे २० वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा व एक हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

थोडक्यात माहिती अशी की, पिडीताचा लातूर येथील राहत्या घरी तिचा जवळचा नातेवाईक आरोपी सागर बाबासाहेब उर्फ धनंजय सूर्यवंशी व तिची पत्नी हे नोकरी निमित्त पीडिताच्या घरी राहण्यासाठी आले. त्यावेळी सन २०१९ मध्ये पीडीता इयत्ता नववी मध्ये शिक्षण घेत होती. पिडीताला शाळेत सोडण्यासाठी व शाळेतून घरी घेऊन येण्यासाठी सदर आरोपी स्कुटीवर जात असे तेव्हा तो पिडीताच्या अंगाला वाईट भावनेने स्पर्श करायचा. पिडीताने विरोध केला तेव्हा तुझ्या आई-वडिलांचा माझ्यावर जास्त विश्वास आहे, मी तुझ्याबद्दल काहीही सांगून तुझी शाळा बंद करतो. अशी धमकी देत असेल तसेच तिची आई, मावशी नोकरीला व भाऊ शाळेत गेल्यावर आरोपी हा पिडीताला शाळेत न जाऊ देता आई-वडिलांना ठार मारण्याची धमकी देऊन तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवत असे व त्याबद्दल घरी किंवा कोणास सांगितल्यास पीडितेची बदनामी करण्याची धमकी देत असे.

काही दिवसानंतर आरोपीच्या पत्नीची निलंगा येथे बदली झाल्याने आरोपी व तिची पत्नी राहण्यासाठी निलंगा येथे गेले त्यानंतर आरोपी हा पिडीताच्या घरी कोणी नसताना वारंवार येऊन तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवत असे. आरोपी पिडीत सोबत वारंवार शारीरिक संबंध ठेवत असल्याने तिने सर्व हकीकत आई-वडिलांना सांगितली त्यावरून आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ३१/ २०२० कलम ३७६ (२)(एन) (एफ) ३५४(अ),५०६ भादवी व बाल लैंगिक अत्याचार अधिनियम कलम ६, ८, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तत्कालीन पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर सचिन सांगळे यांचे मार्गदर्शनात एमआयडीसी पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक गणेश कदम, पोलीस अमलदार विशाल कोडे, मदतनीस महिला पोलीस अमलदार सुजाता कसपटे यांनी सदर गुन्ह्याचा अतिशय बारकाईने व जलद गतीने तपास करून आरोपी विरुद्ध भरपूर पुरावे गोळा करून आरोपी विरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. त्यावर माननीय अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश लातूर श्री. बी. सी.कांबळे यांनी जलद गतीने प्रकरण चालवून सदर प्रकरणात दिनांक १२/०९/२०२३ रोजी निकाल दिला आहे.

सदर प्रकरणात पिडीताचा जवाब व इतर साक्षीदाराच्या आधारावर न्यायालयाने आरोपीस २० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली असून सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण ११ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली असून सरकार पक्षाची साक्ष ग्राह्य धरून मा. अतिरिक्त जिल्हा न्यायालय, लातूर यांनी आरोपी सागर बाबासाहेब उर्फ धनंजय सूर्यवंशी यास पिडीताचा लैंगिक छळ केल्या प्रकरणी २० वर्षाची शिक्षा व एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणात विशेष शासकीय अभियोक्ता श्री. मंगेश महेंद्रकर यांनी सरकार पक्षातर्फे बाजू मांडली त्यांना जिल्हा सरकारी वकील संतोष देशपांडे यांचे सहकार्य लाभले. तसेच सध्याचे पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे हे सदर प्रकरणावर लक्ष ठेवून वेळोवेळी मार्गदर्शन व सूचना करीत होते.

तसेच सदर प्रकरणाचे तपासी अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक गणेश कदम, कोर्टपैरवी चे काम पाहणारे ज्योतीराम माने, महिला पोलीस अमलदार कलमुकले यांनी कोर्ट कामकाजात सहकार्य केले.

## संपादकीय....

# 'इनसायडरां'ची इडा!

देशाच्या प्रगतीसाठी नागरिकांची उद्यमशीलता जितकी महत्त्वाची तितकीच या उद्यमशीलतेचे नियमन करणाऱ्या नियामकांची नियतही महत्त्वाची. हे नियामक जितके निष्पक्ष आणि निःस्पृह तितकी प्रगतीची संधी अधिक समान; हे वैश्विक सत्य. त्यातही भांडवली बाजारासारख्या व्यवस्थेचा कणा हे नियामक असतात. तो ताठ असायला हवा. या नियामकाच्या नियतीविषयी जाहीर संशय घेतला जात असेल तर तो संबंधितांकडून तातडीने दूर केला जायला हवा अथवा वरिष्ठांनी त्याची दखल घेऊन गढूळपणा दूर करायला हवा. तो क्षण भांडवली बाजाराची नियंत्रक असलेल्या 'सेक्युरिटी एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया', म्हणजे 'सेबी'बाबत पुन्हा एकदा येऊन ठेपला आहे. निमित्त ठरले आहे ते उद्योगपती गौतम अदानींसंदर्भात सध्या सुरू असलेला वाद. त्याचे जे काही व्हायचे ते होईल. अदानी यांची एकंदर पोहोच लक्षात घेता शक्यता ही की काही होणारही नाही. तसे झाले तरी ते अपेक्षेप्रमाणेच होईल. यात धक्का बसावा असे काही नाही. म्हणजे मुद्दा अदानी आणि त्यांच्या उद्योगक्षमतेचा नाही. ती त्यांनी सिद्ध केलेलीच आहे. प्रश्न आहे तो 'सेबी' या यंत्रणेचा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या ताज्या प्रतिज्ञापत्रात 'सेबी'बाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले असून त्यात हितसंबंधांचा संघर्ष असल्याचा आरोप तपशिलासह करण्यात आलेला आहे. तांत्रिकदृष्ट्या पाहू गेल्यास न्यायालयाने या प्रतिज्ञापत्राबाबत काही भाष्य करणे, निकाल देणे अथवा ते स्वीकृत करून घेणे इत्यादी टप्पे दूर आहेत. एरवी या टप्प्यावर अशा प्रतिज्ञापत्राची काही दखल घेतली गेली असती असे नाही. पण ती घ्यावी लागते. याचे कारण यात 'सेबी'ची इभ्रत पणास लागलेली आहे. कशी ते समजून घेणे डोळे उघडणारे ठरावे. कोणा अनामिका जयस्वाल यांनी हे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून 'सेबी'ने आपल्या निर्णयांतील विरोधाभास उघड होऊ नये म्हणून कसे कसे प्रयत्न केले याचा तपशील त्यात नमूद करण्यात आला आहे. यात सगळ्यात गंभीर असे दोन मुद्दे. पहिला आहे महसूल गुप्त वार्ता विभागाच्या इशाऱ्याबाबत. या प्रतिज्ञापत्रानुसार २०१४ साली महसूल गुप्तचर विभागाने (डिरेक्टोरेट ऑफ रेव्हेन्यू इंटलिजन्स) 'सेबी'स पहिल्यांदा अदानी समूहाच्या व्यवहारांबाबत सजग केले. हा व्यवहार होता अदानी समूहाने वा समूहाच्या उपकंपन्यांनी आयात केलेल्या विविध यंत्रसामग्रीचा. यात आयात साधनांची किंमत आहे त्यापेक्षा अधिक दाखवली गेली असा वहीम होता आणि या मार्गाने समूहातील काही उपकंपन्यांच्या समभाग दरात काही छेडछाड (मार्केट मॅनिप्युलेशन) झाल्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. असे करून पैसा परदेशात वळवण्यात आल्याचा वहीम महसूल गुप्तचर विभागास होता. तो केवळ व्यक्त करून हे खाते थांबले नाही. अशा प्रकारे 'वळवण्यात' आलेल्या त्यापैकी २,३२३ कोटी रुपयांच्या व्यवहारासंदर्भात महत्वाचे पुरावे असलेली 'सीडी' देखील त्यांनी 'सेबी'च्या प्रमुखास पाठवली. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या प्रतिज्ञापत्रातील नोंदीनुसार या प्रकरणाची चौकशी महसूल गुप्तचर विभागामार्फत केली गेल्याचे 'सेबी'स पत्राद्वारे कळविण्यात आले होते. परंतु ''हे पत्र 'सेबी'ने न्यायालयापासून आजतागायत दडवून ठेवले, हे गंभीर आहे'' असे प्रतिज्ञापत्र नमूद करते. वास्तविक 'सेबी'नेच सर्वोच्च न्यायालयात स्पष्ट केल्यानुसार, अदानी प्रकरणाची चौकशी बाजार नियंत्रक करीत असले तरी त्यात या पत्राचा अंतर्भाव करण्यात आलेला नाही.

प्रश्न येथेच संपत नाही. महसूल गुप्तचर संचालनालयाने हे पत्र 'सेबी'स दिले त्या वेळी, म्हणजे २०१४ साली, या यंत्रणेचे प्रमुख होते यू. के. सिन्हा. या सिन्हा यांचा कार्यकाल २०१७ साली संपला. म्हणजे महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पत्राबाबत त्यांस माहिती असणार. तथापि या सिन्हा यांनी केंद्रीय यंत्रणेच्या पत्रावर काहीही कार्यवाही केली नाही. येथपर्यंत ठीक. त्यांवर निष्क्रियतेचा ठपका ठेवता येईल. पण त्याने काम भागणारे नाही. याचे कारण असे की हे सिन्हा महाशय सेवापूर्तीनंतर एनडीटीव्ही या वृत्तवाहिनीच्या कंपनीत अकार्यकारी संचालक म्हणून रुजू झाले. त्याआधीच ही वृत्तवाहिनी अदानी समूहाचा भाग झाली होती. आता आपल्याच माजी प्रमुखाविषयी 'सेबी' कसे आणि काय बोलणार, हा प्रश्न. तो प्रतिज्ञापत्रात नाही. पण उपस्थित होणे नैसर्गिक. याचे कारण असे की सरकारी यंत्रणांचे प्रमुख हे एकमेकांस सहसा उघडे पडू देत नाहीत. 'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' असे साधारण त्यांचे वर्तन असते. त्यामुळे 'सेबी' सध्या जरी अदानी प्रकरणाची चौकशी करीत असली तरी आपल्याच माजी प्रमुखास या उद्योगसमूहाबाबत केंद्रीय यंत्रणेने दिलेल्या इशाऱ्याचा उल्लेख या चौकशीत नाही. ही बाब सदर प्रतिज्ञापत्र दाखवून देते. हे प्रकरण इतक्यातच संपत नाही.

विख्यात वित्त-वैधानिक सल्लागार सिरील श्रॉफ हे 'सेबी'च्या उद्योगविषयक निती समितीचे सदस्य आहेत. हे सिरील उद्योगक्षेत्रातील आदरणीय सिरील अमरचंद मंगलदास (सीएएम) या कंपनीचे व्यवस्थापकीय भागीदार. भांडवली बाजारात 'इनसायडर ट्रेडिंग' हा अत्यंत गंभीर गुन्हा मानला जातो. भांडवली बाजारात सूचिबद्ध कंपनीच्या समभागांत कंपनीशी संबंधित इसमांनी 'आतील' माहितीच्या आधारे उलाढाल करणे म्हणजे 'इनसायडर ट्रेडिंग'. जी माहिती सर्वसामान्य गुंतवणूकदारांस नसते ती कंपनीत काम करणाऱ्यास असते. तथापि या माहितीचा वापर करून कंपनीच्या समभागांची खरेदी/विक्री करणे हे आधुनिक भांडवलशाहीतील अक्षम्य पाप. ते करणाऱ्यांवर नजर ठेवणाऱ्या समितीत हे सिरील श्रॉफ आहेत. तथापि सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार या श्रॉफ यांची कन्या उद्योगपती गौतम अदानी यांच्या चिरंजीवाची पत्नी आहे. या अशा विवाहात काही गैर आहे असे नाही.

# आपण गमावलं, त्यांनी कमावलं!

साधारण दोन आठवड्यांपूर्वी भारतीय कंपन्यांविषयी दोन महत्त्वाच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. त्यातली पहिली होती गौतम अदानींविषयी. अदानींच्या अविश्वसनीय विकासाला स्टॉकची अफरातफर कारणीभूत असल्याची शक्यता हायडेनबर्ग अहवालामध्ये मांडण्यात आली होती. हा अहवाल आला होता या वर्षीच्या जानेवारी महिन्यात. दोन आठवड्यांपूर्वी आणखी एक बातमी प्रसिद्ध झाली. या बातमीने हायडेनबर्ग अहवालात भर घातली असं म्हणायला हरकत नाही. या बातमीमध्ये दोन नावांचा समावेश आहे. नासेर अली शबन अहली आणि चांग चुंग लिंग. या दोघांनी अदानी ग्रुपच्या कोट्यवधी डॉलर्सच्या किमतीच्या स्टॉक्सचं वर्षानुवर्ष ट्रेडिंग केलेलं आहे. या दोघांचेही अदानी कुटुंबाशी जवळचे संबंध आहेत. अदानींच्या कंपन्यांशी संलग्न असलेल्या इतर कंपन्यांमध्ये त्यांचे शेअर्स आहेत आणि काहींमध्ये ते संचालकही आहेत. या कागदपत्रांनुसार, अदानी ग्रुपच्या स्टॉकमध्ये ट्रेड करण्यासाठी या दोघांनी इनव्हेस्टमेंट फंड्स वापरले होते. त्यांना अदानी कुटुंबातील एका ज्येष्ठ सदस्याचं नियंत्रण असलेल्या कंपनीकडून सूचना मिळत होत्या. दुसरी बातमी होती वेदान्ता ग्रुपविषयी. खाण आणि ऊर्जा क्षेत्रातली ही खूप मोठी कंपनी. भारताचे पर्यावरणविषयक नियम शिथिल करण्यासाठी या कंपनीने लॉबिंग केलं. तोही ग्रामीण भारतात कोविड १९ च्या दुसऱ्या लाटेने हाहाकार माजवलेला असतानाच्या काळात.

लोकांशी सल्लामसलत न करता भारत सरकारने हे बदल कसे मंजूर केले आणि बेकायदेशीर मार्गाने ते कसे लागू केले याचा पर्दाफाश या बातमीमध्ये करण्यात आला होता. खाण व्यवसायात ५० टक्क्यांपर्यंत उत्पादन काढण्यासाठी नव्याने पर्यावरणविषयक मंजुरी घ्यावी लागते. वेदान्ताने तशी परवानगी घ्यावी लागू नये यासाठी जोरदार प्रयत्न केले. केर्न इंडिया ही वेदान्ता समूहातली तेल कंपनी आहे. सरकारी लिलावामध्ये मिळालेल्या तेल ब्लॉक्सचं उत्खनन करण्याची परवानगी मिळवण्यासाठी जनसुनावणी घेणं बंधनकारक असतं. हे बंधन काढून टाकण्याकरता केर्न इंडियाने प्रयत्न केले आणि त्यात ते यशस्वीही झाले. त्यानंतरच्या काळात केर्नच्या सहा वादग्रस्त तेल प्रकल्पांना राजस्थानमध्ये मंजुरी मिळालेली आहे. स्थानिक पातळीवर त्याला विरोध होत असतानाही.

वेदान्ताशी संबंधित दोन ट्रस्ट्सनी २०१६ ते २०२० या काळात भारतीय जनता पक्षाला ६.१६ मिलयन डॉलर्स (५१ कोटींपेक्षा जास्त) एवढ्या देणग्या दिलेल्या आहेत. दोन्हीमधला परस्परसंबंध इथे स्वच्छ दिसतोय. या दोन्ही बातम्या ओसीसीआरपी- ऑर्गनाइज्ड क्राइम अँण्ड करप्शन रिपोर्टिंग प्रोजेक्ट- या शोधपत्रकारिता करणाऱ्या नेटवर्कने प्रसिद्ध केल्या आहेत. ओसीसीआरपीचे पत्रकार जगातल्या सहा खंडांमध्ये कार्यरत असून त्यांचं मुख्यालय ॲम्स्टरडॅम इथे आहे. अदानींवरच्या बातमीवर आनंद मंगनाळे आणि रवी नायर यांनी काम केलं, तर वेदान्तावरची बातमी अक्षय देशमानेने केली. हे तिघेही दिल्लीत राहणारे स्वतंत्र पत्रकार आहेत.

सर्वसाधारणपणे, ज्यांच्याकडे आर्थिक बळ आहे ती माध्यमं अशा प्रकारच्या शोध पत्रकारितेचं काम हाती घेतात. कारण अशा बातम्या शोधायच्या तर त्यासाठी वेळ लागतो, संसाधनं लागतात. पण भारतात हे घडायचं आता थांबलेलं आहे. मग, मेहनत घेऊन, माहिती खणून काढलेल्या बातम्या तुमच्यासमोर येतात तेव्हा प्रसारमाध्यमं काय करतात? भारतीय प्रसारमाध्यमं त्याकडे दुर्लक्ष करत नाहीत. ती इतकी कणाहीन झालेली आहेत की, अनेक महिने काम करून, देशातल्या शक्तिशाली लोकांविषयी माहिती खोदून काढण्याचा धोका पत्करून ज्यांनी या बातम्या केल्या त्या पत्रकारांच्या आणि संस्थेच्या विश्वासार्हतेवरच ते संशय व्यक्त करू लागतात.

मुख्य प्रवाहातल्या प्रसारमाध्यमांनी या बातम्यांवर चर्चा करायला सुरुवात केली तेव्हा अशा बातम्या येण्यामागे कोणती 'वेळ' साधण्यात आली आहे हा त्यांचा मुख्य विषय होता. जी ट्रेंटींच्या तोंडावर ओसीसीआरपीचा हेतू नरेंद्र मोदी यांना बदनाम करण्याचा होता असा सूर टीव्हीवरच्या अँकर्सनी लावला. सर्व पुराव्यांसहित भरपूर संशोधन करून केलेल्या बातमीला 'भारतीय उद्योगांवर झालेला हल्ला' असं लेबल लावण्यात आलं. माध्यमांमध्ये आलेल्या प्रत्येक बातमीमध्ये ओसीसीआरपीचं वर्णन वादग्रस्त अब्जपती जॉर्ज सोरोस यांची गुंतवणूक असलेली संस्था म्हणून करण्यात आलं.

जॉर्ज सोरोसने आजवर विशिष्ट सामाजिक- राजकीय विचारसरणीला आर्थिक मदत केलेली आहे. हा ज्यू माणूस नाझींच्या अत्याचारांमधून वाचलेल्या काही थोडक्या लोकांपैकी एक आहे. टोकाची उजवी विचारसरणी असलेली मंडळी सोरोसचा द्वेष करतात. परंपरा, धर्म आणि देश यांची स्वायत्तता नष्ट करण्याचा कट रचणाऱ्यांच्या मागे उभा राहणारा अदृश्य हात, असा आरोप सोरोसवर गेली अनेक वर्षे झालेला आहे. दुसऱ्या देशांच्या कारभारामध्ये 'ढवळाढवळ' करणारी व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे बघितलं जातं. भारतातले उजव्या विचारसरणीचे लोक त्यांचा तिरस्कार करतात कारण सोरोस मोदींवर टीका करतात. भारतीय प्रसारमाध्यमांनी या सगळ्याची चर्चा केली. पण एका मुद्द्याची चर्चा करायला ही माध्यमं विसरली. ओसीसीआरपीच्या अहवालात तथ्य किती आहे याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करायचं त्यांनी ठरवलं.


वस्तुस्थिती अशी आहे की, ओसीसीआरपीला मिळत असलेल्या आर्थिक साहाय्यामध्ये सोरोसच्या फाऊंडेशनचा सहभाग केवळ चार टक्के इतका आहे. ओसीसीआरपीला झोडपून काढणाऱ्या एकानेही याचा उल्लेख केला नाही. ड्र्यू सलिवन हे ओसीसीआरपीचे सहसंस्थापक. ट्विटरवर त्यांनी या संदर्भात मोठा थ्रेड लिहिलाय. ओसीसीआरपीला अर्थसाहाय्य करणारे ४० हून अधिक देणगीदार आहेत. मात्र संपादकीय धोरणात त्यांचा कोणताही हस्तक्षेप असणार नाही, असा करार या सर्वांबरोबर केला जातो. 'आमच्या देणगीदारांना न आवडणाऱ्या अनेक बातम्या आम्ही केलेल्या आहेत. पण त्या चुकीच्या आहेत असं कोणीही म्हणू शकत नाही. आमच्यावर टीका होते तेव्हा ती प्रामुख्याने आमच्या बातम्यांच्या खरेपणाविषयी नसते,' असं ट्वीट करून ते म्हणतात, 'फॉलो द फॅक्ट्स. दे विल सेट यू फ्री. पुढच्या वेळेला तुम्ही ओसीसीआरपीची बातमी वाचाल तेव्हा लक्षात घ्या की, यासाठी ६० हून अधिक देशातल्या, विविध भाषा आणि संस्कृती यांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या पत्रकारांनी त्यावर काम केलंय.'

ओसीसीआरपीच्या बातम्यांचा परिणाम जगभर झालेला आपल्याला दिसतो. त्यांनी शोधून काढलेल्या घोटाळ्यांमुळे सरकारी पातळीवर १० बिलियन डॉलर्सहून जास्त दंड आकारला गेलाय किंवा संबंधितांची संपत्ती जप्त करण्यात आलेली आहे. राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान आणि बड्या आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेशन्सच्या सीईओंसकट महत्त्वाच्या अशा १३१ व्यक्तींना ओसीसीआरपीमुळे राजीनामे द्यायला लागले आहेत किंवा त्यांची हकालपट्टी झालेली आहे. या बातम्यांमुळे आजवर ६२१ लोकांना अटक झालेली आहे, त्यांच्यावरचे आरोप सिद्ध झालेले आहेत किंवा त्यांना शिक्षा झालेली आहे. जगभरातल्या विविध सरकारांना त्यामुळे ३९८ प्रकरणात अधिकृत तपास करणं भाग पडलेलं आहे. जगभर प्रभावी ठरलेल्या अशा संस्थेच्या शोध पत्रकारितेवर आरोप करणं म्हणूनच मूर्खपणाचं आहे.

पण ओसीसीआरपीवर होत असलेल्या हल्ल्यामधून ओसीसीआरपीविषयी कमी आणि भारतीय प्रसारमाध्यमांवर जास्त भाष्य होतंय. आपण कोणत्या गोष्टींना प्राधान्य देऊ लागलोय हे यातून स्पष्ट होतंय. आपला कल सत्याच्या बाजूने नाही हे विदारक सत्यही यातून समोर येतंय. परिणामी, अर्थपूर्ण बातम्या करण्याची इच्छा असलेल्या भारतातल्या अनेक तरुण, हुशार पत्रकारांना आज बाईट पत्रकारिता करावी लागतेय.

अशा स्वतंत्र आणि भरीव कामगिरी करून दाखवण्याचं स्वप्न पाहणाऱ्या, पण ते करण्याची संधी न मिळणाऱ्या पत्रकारांना आंतरराष्ट्रीय माध्यमांनी हुशारीने हाताशी धरलं आहे. गेल्या काही वर्षांमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताविषयी खूप जास्त महत्त्वाच्या बातम्या येऊ लागल्या आहेत. कारण ही परदेशी माध्यमं बातमी खणून काढण्यासाठी भारतातल्या पत्रकारांवर अधिकाधिक विश्वास टाकू लागली आहेत. प्रस्थापित व्यवस्थेच्या बाजूने असलेले संपादक भारतीय पत्रकारांना त्यांच्या इच्छेनुसार काम करू देत नाहीत. अशा तरुण पत्रकारांसाठी आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांनी एक महत्त्वाचा दरवाजा उघडलाय. आपल्या व्यवसायाविषयी, आपल्या कामाविषयी समाधान मिळवून देईल असा दरवाजा. भारतीय माध्यमांनी गमावलं आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांनी कमावलं अशी ही स्थिती आहे.

OCCRP



# अर्थसंकल्पीय तरतुदीऐवजी 'दात कोरून..'?

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंच्या नावे दिल्या जाणाऱ्या राज्य 'आदर्श शिक्षक पुरस्कार' कार्यक्रमात शालेय शिक्षणमंत्र्यांनी महत्त्वाच्या घोषणा केल्या. महाराष्ट्रात एक 'नवं युग' आणण्याचा दावा करत ''राज्यातील कंपन्यांच्या 'सीएसआर'चा (कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी) पैसा सरकारी शाळांकडे वळवून शाळांचा दर्जा राखण्याची जबाबदारी त्या कंपन्यांची'' केली जाईल, असं सांगितलं. यामुळे ''कोणत्या कंपनीची शाळा चांगली आहे अशी स्पर्धा शाळाशाळांमध्ये लागेल'' (व दर्जा सुधारेल). या बदल्यात, ''ती कंपनी स्पॉन्सर करेल तिचं नाव पाच किंवा दहा वर्षांसाठी शाळेला'' लावलं जाईल. जवळपास ६५,००० सरकारी शाळांमधील ''इन्फ्रास्ट्रक्चर सुमार दर्जाचं असल्यामुळं जे ज्ञान माननीय पंतप्रधान आपल्याला देऊ इच्छितायत'' ते देण्यात अडचणी येतायत, म्हणून ही योजना आणलीय. 'दत्तक देणे' या शब्दाचा वापर टाळून मांडलेली योजना म्हणजे 'शाळांचं दत्तकविधान' आहे. तिथं उपस्थित अर्थ तथा उपमुख्यमंत्र्यांनी ''आपल्या राज्यात काही हजार कोटी रुपये सीएसआर निर्माण होतो, पण बहुतेक जण महाराष्ट्रात खर्च करत नाहीत,'' असं सांगून ''यातला ५० टक्के पैसा जरी राज्यात खर्च झाला तर सगळ्या शाळांचं इन्फ्रास्ट्रक्चर वाढेल,'' असा आशावाद व्यक्त केला. शिक्षकदिनी सरकारी शिक्षकांचा सत्कार करतानाच सरकारी शाळांची गुणवत्ता खासगी कंपन्यांवर सोडून देण्याचं, एरवी धाडसी वाटणारं काम मंत्रीद्वयांनं सहज केलं. ज्या 'सीएसआर'चा पुनरुच्चार व जयघोष करत सरकारने गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या घटनादत्त व बंधनकारक कर्तव्यातून पलायनाची वाट आखून घेतलीय, त्याचा विचार थोडा बारकाईनं करणं औचित्याचं ठरेल. 'कंपनी कायदा २०१३'च्या कलम १३५ नुसार केवलमूल्य ५०० कोटींपेक्षा जास्त किंवा उलाढाल १००० कोटींपेक्षा जास्त किंवा वार्षिक नफा पाच कोटींपेक्षा जास्त असलेल्या प्रत्येक कंपनीने तिच्या तीन वर्षांच्या सरासरी नफ्याच्या दोन टक्के इतकी रक्कम 'सीएसआर' स्वरूपात समाजोपयोगी कामासाठी खर्च करणे बंधनकारक आहे. हा कायदा लागू झाल्यापासून म्हणजे २०१४-१५ ते २०२१-२२ या आठ वर्षांच्या कालावधीत देशपातळीवर खर्चित 'सीएसआर'च्या रु. १,५३,५५१ कोटींपैकी ७६,१७९ कोटी रु. म्हणजे जवळपास निम्मा खर्च शिक्षण आणि आरोग्यावर झालाय. या दीड लाख कोटींपैकी महाराष्ट्राचा वाटा सर्वाधिक म्हणजे २३,८८६ कोटी रु. आहे. या खालोखालच्या कर्नाटक, गुजरात, तमिळनाडू या राज्यांचा एकत्रित हिस्सा महाराष्ट्रापेक्षा थोडा कमी म्हणजे २३,५६१ कोटी रु. आहे. राज्याच्या स्थापनेपासून औद्योगिकीकरणात राज्याने घेतलेल्या आघाडीचं हे निदर्शक आहे. मात्र २०१४-१५ ते २०२१-२२ दरम्यानच्या राज्यवार 'सीएसआर'वाढीच्या दराचा आढावा घेतला तर महाराष्ट्र थेट १७ व्या क्रमांकावर दिसतो. शिवाय 'सीएसआर'मधली आंतरजिल्हा विषमता शब्दशः भीषण आहे. उदाहरणार्थ, शिक्षण (व अपंगत्व तथा उपजीविका) अंतर्गत २०१४-१५ ते २०२०-२१ पर्यंतच्या सात वर्षांत पुणे जिल्ह्याला सर्वाधिक म्हणजे सुमारे रु १,०२६ कोटी मिळाले. याच कालावधीत वाशिमला सर्वात कमी म्हणजे केवळ ७४ लाख, परभणीला केवळ ७६ लाख, तर हिंगोलीला केवळ ८६ लाख रुपये मिळाले. 'सीएसआर'च्या वाटपातूनही राज्यातील 'विकासाचा अनुशेष' असा लख्ख दिसतो. कंपन्यांनी घोषित केलेल्या जिल्ह्यांनुसार राज्यातील प्रथम आणि शेवटच्या जिल्ह्यांमधली शिक्षणातील 'सीएसआर'ची सात वर्षांची एकत्रित तफावत तब्बल १,३८,६५४ टक्क्यांची आहे. वरचे पाच (पुणे, मुंबई, रायगड, ठाणे, औरंगाबाद) आणि तळाचे पाच (वाशिम, परभणी, हिंगोली, बीड, जळगाव) जिल्हे तुलनेला घेतले तरी ही तफावत तब्बल २७,९०३ टक्के इतकी प्रचंड आहे. पुणे व मुंबईला मिळालेला एकूण निधी उर्वरित सर्व जिल्ह्यांच्या एकत्रित निधीच्या दीडपटीपेक्षा जास्त आहे. याशिवाय, उपरोक्त कलम १३५ मधील पोटकलम ५ नुसार कंपन्यांनी 'आपल्या कार्यक्षेत्राच्या आसपासच्या, स्थानिक भागाला प्राधान्य देणं' अपेक्षित आहे. 'सीएसआर'संबंधी कायदा केंद्र सरकारच्या अखत्यारीतला असल्यामुळं नववे आदेश काढून सीएसआरचा निधी कधीही वळवला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, २०२० च्या पूर्वार्धात 'पीएमकेअर्स'ला दिला जाणारा निधी 'सीएसआर'मध्ये ग्राह्य धरण्यात आल्याच्या प्रसिद्धीपत्रकानंतर ऐन करोनाच्या वर्षांत अनेक सरकारी व खासगी कंपन्यांचा 'सीएसआर' मोठ्या प्रमाणात 'पीएमकेअर्स'कडे वळाला. मग 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत जनजागृती मोहिमा राबवणं, झेंडे वितरित करणं 'सीएसआर'चा निधी देण्याची 'मुभा' देण्यात आली. अशा प्रकारे 'सीएसआर' म्हणजे 'एक अनार, सौ बीमार' अशी गत झालीय. एखाद्या राज्यात तथाकथित 'डबल इंजिन' सरकार असलं तरी मध्यवर्ती सरकारचे आदेश राज्यांच्या आदेशांपेक्षा प्रबळ असल्यामुळं तो निधी गृहीत धरून केलेलं नियोजन कोलमडू शकतं. या पार्श्वभूमीवर 'सीएसआर'च्या जोरावर सरकारी शाळांसाठी 'नव्या युगाची' योजना दिशाभूल करणारी, अव्यवहार्य आणि धोकादायक ठरते. उपरोक्त कार्यक्रमात शालेय शिक्षणमंत्र्यांनी ज्या इन्फ्रास्ट्रक्चरचा उल्लेख केला त्यात 'चांगले रंगकाम, चांगली चित्रे, चांगले छप्पर (इमारत), बसायला चांगले बेंच, इंटरॲक्टिव्ह टीव्ही' या साऱ्यांचा समावेश आहे. राज्यातील ६५,००० शाळांसाठी प्रत्येकी केवळ दोन लाख रुपयांची तरतूद सरासरी धरली तरी पहिल्याच वर्षी १,३०० कोटी रुपयांची गरज भासेल. त्यातही पश्चिम महाराष्ट्रात एकवटलेला 'सीएसआर'चा निधी राज्यात इतरत्र वळवणं आदर्श शिक्षकांसमोर भाषण करण्याइतकं सोपं नाही. मध्यवर्ती सरकारकडून तसे आदेश निर्गमित करून घ्यावे लागतील; मात्र कॉर्पोरेट जगताचा दबदबा व पडद्याआडची ताकद पाहता हे शक्य नाही. एक वेळेस एखादं सरकार बदलेल, पण कॉर्पोरेट जगताच्या सहमतीविना कोणताही मुद्दा रेटता येत नाही. नफ्यातल्या २ टक्क्यांच्या बदल्यात कॉर्पोरेट जगताला समाजोपयोगी कामातले प्राधान्यक्रम ठरवून स्वतःसाठी चिरकालीन सद्भावना निर्माण करण्याची अफाट संधी २०१३ च्या 'कंपनी कायद्या'ने दिलीय. यामागे कॉर्पोरेट जगताचा दबाव नव्हता, असं ठामपणे म्हणता येत नाही. तसं असतं तर विविध करांवरील अधिभाराप्रमाणे (सेस) सरकारने या २ टक्केअंतर्गतचा निधी वेगळा जमा करून समाजोपयोगी कामासाठी वापरला असता.

# सरकारी कावा, समजून घे भावा..

भारतात लोकाशाही लागु झाली पण लोकशाहीची फळे सर्वसामान्य लोकांना अजूनही चाखायला मिळत नाहीत याची खंत आहे. लोकशाही ची फळे लोकांनाच का चाखायला मिळत नाहीत यासाठी आपल्याला व्यवस्था समजून घेणे आवश्यक असते. परंतु बऱ्याच लोकांना व्यवस्था कळतच नाही. भारत हा विषमता, अज्ञान, अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरीने बरबटलेला होता. एकाच समुहाचे वर्चस्व कायम राहुन इतरांनी त्यांची गुलामी करावी अशा निच मानसिकतेचे निच लोकांनी येथील समाज व्यवस्था विस्कळीत करून टाकली होती. माणसाला हक्क अधिकारापासून, शिक्षणा पासून, विकासा पासून जाणीव पुर्वक दुर ठेवून लोकांना धार्मिक व अंधविश्वासु बनवून त्यांना लुटण्याचे काम करून स्वतः चे पातर संरक्षित करणाऱ्या निच लोकांमुळे देशात विषमता, अंधविश्वास खोलवर गेला, हक्क अधिकार, शिक्षण व सर्वांगीण विकासा पासून लोक खुप दुर गेले. परंतु भारतीय संविधानाने विषमता, पाखंड, अज्ञान, अंधविश्वास मातीत गाडून हजारो वर्षापासून चालत आलेल्या एकाच समुहाच्या वर्चस्वाला सुरुंग लावला आणि सर्वांना सत्ता, संपत्ती, शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि इतर सर्वांगीण विकासाच्या क्षेत्रात समान संधी व समान दर्जा निर्माण करून दिला. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून हजारो वर्षाची विषमता वादी व मानवतेला काळीमा फासणारी व्यवस्था गाडून एक आदर्श समता बंधुता न्याय व स्वातंत्र्यावर आधारित व्यवस्था निर्माण केली म्हणून देशाचे नाव जगात रोशन झाले व भारतीय लोकशाहीचे जगभर कौतुक होऊन देशाचा सन्मान वाढत गेला. भारतीय संविधान व बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर हे त्याच लोकांना कळतात, त्यांच लोकांच्या पचणी पडतात, जे लोक नैतिक दृष्टीने प्रामाणिक आहेत व त्यांचा समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्यावर विश्वास आहे आहे माणस–ला माणूस म्हणून पाहिले पाहिजे, माणसाची ओळख कलागुणांनी व्हायला पाहिजे त्याच लोकांना बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान कळते. मनात विषमतेची घाण असलेल्या, आणि जातीवादी विचाराला खतपाणी घालून स्वतः चा च डोंबारा पिटणाऱ्या मानसिक रुग्णांना डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान कधीच कळणार नाही. संविधानाने हक्क अधिकार व सर्वांगीण विकासाची संधी दिली म्हणून भारतीय लोक शिक्षण घेऊन सत्ता संपती मध्ये सक्रिय होताना दिसत आहेत. हक्क अधिकार मागताना दिसत आहेत. सर्व जन भारतीय म्हणून सारख्या खुर्चीवर, सारख्या कपड्यात एकाच रांगेत बसत आहेत हे केवळ आणि केवळ बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या संविधानामुळेच. महिलांना महिलांचा दर्जा निर्माण करून आदर, मानसन्मान, हक्क अधिकार केवळ आणि केवळ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे मिळाले याची जाणीव च महिला नाही आणि ती जाणीव त्यांना होऊच नये याची पुर्ण खबरदारी घेतली जाते. थोडक्यात काय तर लोकशाही लागु होऊन अनेक वर्षे झाली तरीही सरकारने लोकशाही बाबात जागृती करून त्याची फळे लोकांना चाखायला दिलीच नाही. आजही देशातील सत्तेत विशिष्ट लोकांचेच वर्चस्व आहे. विशिष्ट लोकांचेच शिक्षण, रोजगार समस्या दुर होऊन त्यांची आर्थिक भरभराट झालेली आहे. बाकीच्या जनतेला माठातील पाझरणारे पाणी दाखवून खुश केले जाते आणि माठातील थंडगार पाणी पाणी मात्र मोजकेच लोक पिऊन बाजूला होतात. सर्वसामान्य लोकांना पाझरणारे पाणी दाखवून त्यावरच एकमेकांना मध्ये लढवले जाते. व सत्तेचा उपभोग विशिष्ट वर्गच घेतो. हा सरकारी कावा आपण समजून घेणे आवश्यक आहे. आरक्षणाच्या नावाखाली एकमेकांना सोबत लढवले जाते. कधी मराठा ओबिसी, धनगर, एससी मध्ये अ ब क ड असे आर–क्षणा संदर्भात वाद लाऊन जनतेची दिशाभूल केली जाते. आमचे आरक्षण धोक्यात म्हणजे लोक रस्त्यावर येतात आंदोलन करतात याचा फायदा निवडणूक मध्ये सत्ताधारी लोक घेतात विषय संपतो. कधी कधी जातीय व धार्मिक तेढ निर्माण करून दोन गटात वाद निर्माण करून देतात, लोक एकमेकांना सोबत भांडत बसतात, दोन्ही गटातील तरुणांवर गुन्हे दाखल होतात तेढ निर्माण करणारे आणि जाती धर्माचा गर्व आहे म्हणणारे कुठे गायब होतात काहीच कळत नाही. कधी कधी सरकारची बी टिम म्हणून काम करणाऱ्या लोकांना वादग्रस्त विधाने कयायल लाऊन वादग्रस्त विधान करणाऱ्यांवर कार्यवाही होत नाही अनेक जन आंदोलन करतात, वादग्रस्त विधान करणाऱ्या विरोधात रस्त्यावर येतात त्यावेळी न्याया साठी रस्त्यावर आलेल्या तरुणांवर गुन्हे दाखल करून आवाज दाबला जातो. थोडक्यात काय तर वेगवेगळ्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांच्या तरुणांवर गुन्हे दाखल करून त्यांना रोजग–ारापासुन दुर करायचे, शिक्षणापासून दुर करायचे, आणि सत्तेची पोळी भाजुन घ्यायची. आरक्षणावर वाद निर्माण करून ठेवायचे परंतु प्रत्यक्षात आरक्षण नष्ट करून टाकायचे. बऱ्याच लोकांना आरक्षण संपले आता आरक्षणासाठी लढणे केवळ आपला वेळ पैसा खर्च करणे आहे याची जाणीव नाही. ज्या ठिकाणी आरक्षण आहे ते क्षेत्र खाजगी लोकांना दिले जात आहेत. खाजगी क्षेत्रात आरक्षण लागु नसते मग आरक्षणासाठी लढून शक्ती वाया घातल्या पेक्षा आर–क्षणाचे क्षेत्र वाचवण्यासाठी लढा उभा करणे आवश्यक आहे. परंतु सरकार जाणीव पुर्वक आरक्षणाचा मुद्दा तानुन ठेवून आरक्षणाचे क्षेत्र विकत आहे. आताच सरकारने जाहीर केले की बासष्ट हजार शाळा खाजगी कंपणीला चालवायला देणार म्हणजे त्या शाळेत शासकीय नियम नसणार. हजारो लाखो रुपये फी आकारून सर्वसामान्य लोकांना शिक्षणापासून दुर करणार, पैशावाल्या श्रीमंत लोकांना शिक्षणाचा अधिकार राहणार तेथे आरक्षणाचा प्रश्नच राहत नाही. सरकार शाळा खाजगी कंपनीला का देत आहे तर सरकारला शाळा चालवता येत नाहीत. जर सरकारला शाळा चालवता येत नसतील तर सरकार बदलायचे असते शाळा विकायची नसते. हे अस झाले एखाद्या बंगल्यावर एखादा सेक्युरिटी गार्ड नेमला आणि त्याला तिथे सेक्युरिटी चे काम करायचा कंटाळा आला तर त्याने बंगलाच विकला. शासकीय शाळा ह्या सत्तेत बसलेल्या लोकांची खाजगी मालमत्ता नाही तर सर्व सामान्य लोकांची मालमत्ता आहे. जनतेला विश्वासात न घेता शाळा खाजगी कंपनीला देणे म्हणजे सरकार काम करायला अपयशी आहे हेच सिद्ध होते. ज्या शाळा सरकारला चालवता येत नाही त्या शाळा उद्योगपतींना कशा चालवता येतील? उद्योगपती कोणतेही काम फायद्यासाठी करत नाहीत मग तोट्यात चाललेल्या शाळा, इतर सार्वजनिक मालमत्ता उद्योजक चालवायला का घेईल? हे आपण समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षकाची कंत्राटी भरती करून त्यांना पंचवीस ते पस्तीस हजार पगार देण्याचे सरकारने ठरवले आहे. शासकीय कार्यालयात कर्मचारी हे खाजगी कंपणी कडून नियुक्त केले जातील याचे ध्येय धोरणे आखले आहेत. मग या ठिकाणी आरक्षणाचा फायदा कसा व कोणाला मिळेल? एकिकडे आर–क्षणावर लढवायचे आणि दुसरीकडे ते बंद करण्याचे कटकारस्थान करायचे हा कावा सरकारचा आहे. हे ओळखने गरजेचे आहे. शिक्षणाला महाग करून लोकांनी शिक्षण घेऊ नये, आणि काही लोकांनी पैशाच्या जोरावर शिक्षण दिलेच तर भविष्यात नोकरी मिळू नये अशा प्रकारची व्यवस्था निर्माण करण्याचे काम सरकार करत आहे. पंचवीस तिस हजार रुपये महिन्याचा सरकारी नोकर तयार करताना स्वतः मात्र दरमहा लाखो रुपयाचा पगार व इतर मानधन घेणाऱ्या लोकांकडे नैतिक शिल्लक असेल का याचा विचार जनतेने करणे आवश्यक आहे. आज लाखों रुपये शिक्षणावर खर्च करून भविष्यात शिक्षणाच्या जोरावर रोजगार मिळत नसेल तर शिक्षणाचे महत्त्व आपोआप कमी होईल. म्हणजे अडाणी व बेरोजगार लोकांची फौज निर्माण करून त्यांच्या कडून सत्तेतील लोकांच्या हिताचे काम सहज करून घेतले जातील. कमी खर्चात व सत्तेतील लोकांच्या मागे पुढे तरुण वर्ग हाजी हाजी करेल. याचाच परिणाम हळूहळू भारतीय लोक पुन्हा गुलामी व लाचारी कडे जातील. लोकांना जागृत करून स्वाभिमान निर्माण करण्याचे काम फक्त आणि फक्त शिक्षण करू शकते. म्हणून महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला अत्यंत महत्व दिले व लोकांना जागृत केले. आता सरकार शिक्षण बंद करून पुन्हा जनतेला गुलामीच्या व लाचारीच्या खाईत ढकलण्याचा प्रयत्न करत आहे. हा कावा आपण समजून घेणे आवश्यक आहे. आणि लोकहिताचे कामे व भारतीय नागरिकांचे हक्क अधिकार अबाधित ठेवायचे असतील तर जागृत लोकांनी ईव्हीएम ला विरोध करून बॅंलटपेपर निवडणूक घेण्यासाठी सरकारला भाग पाडावे तरच लोकशाही वाचुन हक्क अधिकार आपले संरक्षित राहतील.

\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# शेतकऱ्यांनी कमी पाण्यात अधिक उसउत्पादन घ्यावे तांत्रीक मार्गदर्शन आणि सहकार्य कारखान्याच्या वतीने करण्यात येईल -माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांची ग्वाही

लातूर :– शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी, कर्ज, तंत्रज्ञान प्रशिक्षण आणि इतर सर्वप्रकारचे सहकार्य केले जाईल. साखर कारखाना वर्षभर म्हणजे सलग ३६५ दिवस चालवा या दृष्टीने उपपदार्थ निर्मिती केली जाईल. वीज, बायोगॅस आणि इथेनॉलवर चालणारी वाहने तयार होत असल्यामुळे कारखान्यात सर्वच प्रकारच्या उच्च दर्जाची इंधन निर्मिती केली जाईल. कारखान्यात लागणाऱ्या मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या मुलांना प्राधान्याने प्रशिक्षित करण्याची योजना राबवली जाईल. कारखान्याचे सभासद, कर्मचारी, कामगार या सर्व घटकांना कौटुंबिक विमा संरक्षण देण्यात येईल. माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांनी घालून दिलेली लक्ष्मण रेषा आणि आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांची शिस्त या गोष्टीचा विचार करून जिल्ह्यातील सहकारी संस्थांचा विस्तार आणि कारभार केला जाईल. मांजरा परिवारातील साखर कारखान्यात सकारात्मक स्पर्धा सुरू ठेवून शेतकरी आणि ग्रामीण भागाचा विकास साधला जाईल लातूर आणि परिसरातील दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. चाटा, भोयरा परिसरात तिसरा टप्प्यातील लातूर एमआयडीसीच्या विस्तारासाठी प्रयत्न केले जाते. माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांच्या स्मारकाचे लोकार्पण आणि प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन लवकरच करण्यात येईल अशी ग्वाही यावेळी बोलताना दिली.

आपल्याकडे नेममीच निर्माण होणारी अवर्षणाची परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून उसाचे एकरी अधिकाधिक उत्पादन घ्यावे असे आवाहन करून शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी, आवश्यक असणारे कर्ज, तंत्रज्ञान प्रशिक्षण आणि इतर सर्वप्रकारचे सहकार्य साखर कारखान्यामार्फत केले जाईल असे आश्वासन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिले. लातूर तालुक्यातील निवळी येथे विलास सहकारी शेतकरी साखर कारखान्याच्या अध्यक्षा आदरणीय आई वैशालीताई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आज अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या कारखान्याच्या २१ व्या सर्वसाधारण सभेत माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख बोलत होते. यावेळी व्यासपीठावर लातूर ग्रामीणचे आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन गणपतराव बाजुळे, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन श्रीशैल उटगे, जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन ॲड. प्रमोद जाधव, रेणा साखर कारखान्याचे माजी चेअरमन यशवंतराव पाटील, मांजरा कारखान्याचे माजी चेअरमन धनंजय देशमुख, ट्वेन्टीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनील पडिले, व्हा.चेअरमन रविंद्र काळे, कार्यकारी संचालक संजीव देसाई, सर्व संचालक व मान्यवरांची उपस्थिती होती. या प्रसंगी पूढे बोलतांना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले की, यावर्षी पून्हा अवर्षणा सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. आता पर्यंत सरासरीच्या ५० ते ६० टक्केच पाऊस झाला आहे. आणखी पाऊस पडेल अशी अपेक्षा

आहे. मात्र दर आठ दहा वर्षाला आपल्याकडे दुष्काळी परिस्थिती निर्माण होते अशा टंचाईच्या परिस्थितीत कमी पाण्यात एकरी अधिक उत्पादन घेणेसाठी शेतकऱ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी लागणारे तंत्रज्ञान, कर्ज, मार्गदर्शन कारखान्यामार्फत यापूढे पूरवले जाणार आहेत. आपल्या कडील साखर कारखाना वर्षभर म्हणजे सलग ३६५ दिवस चालावेत या दृष्टीने उपपदार्थ निर्मिती केली जाईल. वीज, बायोगॅस आणि इथेनॉलवर चालणारी वाहने तयार होत असल्यामुळे कारखान्यात सर्वच प्रकारच्या उच्च दर्जाची इंधन निर्मिती केली जाईल. कारखान्यात लागणाऱ्या मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या मुलांना प्राधान्याने प्रशिक्षित करण्याची योजना राबवली जाईल. कारखान्याचे सभासद, कर्मचारी, कामगार या सर्व घटकांना कौटुंबिक विमा संरक्षण देण्यात येईल. माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांनी घालून दिलेली लक्ष्मण रेषा आणि आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांची शिस्त या गोष्टीचा विचार करून जिल्ह्यातील सहकारी संस्थांचा विस्तार आणि कारभार केला जाईल.मांजरा परिवारातील साखर कारखान्यात सकारात्मक स्पर्धा सुरू ठेवून शेतकरी आणि ग्रामीण भागाचा विकास साधला जाईल, लातूर आणि परिसरातील दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. चाटा, भोयरा परिसरात तिसरा टप्प्यातील लातूर एमआयडीसीच्या विस्तारासाठी प्रयत्न केले जातील अशी ग्वाही या प्रसंगी आमदार अमित देशमुख यांनी दिली. माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या स्मारकाचे लोकार्पण आणि प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन नोव्हेबर महिन्यात करण्यात येणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगीतले.

ऊसासोबतच आता इंधन उत्पादक शेतकरी व्हावा आमदार धिरज विलासराव देशमुख

आपला शेतकरी ऊस उत्पादनात खूप पुढे गेला आहे. परंतू, काळाची पावले ओळखून शेतकऱ्यांनी ऊस उत्पादनासोबतच आता इंधन उत्पादक व्हावे, असे



आवाहन यावेळी बोलताना आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केले. ते पुढे म्हणाले, लोकनेते विलासराव देशमुख यांनी २१ वर्षांपूर्वी लावलेल्या विलास सहकारी साखर कारखान्याचे लावलेल्या रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे. याचा अभिमान आणि आजची वाटचाल कौतुकास्पद आहे. या कारखान्याच्या माध्यमातून आज महिला शेतकरी भगिनींना सन्मानित करण्यात आले आणि प्रोत्साहन देण्यात आले सन्मान करण्यात आला. एक काळ होता या कारखान्याचे शेअर घ्या म्हणावे लागत होते, पण आज शेअर देण्याची मर्यादा संपली असे सांगावे लागत आहे. आपली कारखाना गाळप क्षमता, इतर उत्पादण करणारे सह

प्रकल्प पाहता आपली मांजरा परिवारातील सर्व साखर कारखाने एकमेकांशी सकारात्मक स्पर्धा करीत आहेत. हे सर्व आपल्या सक्षम नेतृत्वामुळे होत आहे हे आवर्जून सांगावे लागेल. सहकारातून विकास हा आपल्याला आपल्या नेतृवाने दिलेला मूलमंत्र आहे. याच मूलमंत्राचा अवलंब करीत नवीन सह उद्योग, नव उद्योजक, रोजगार निर्मिती अधिकाधिक कशी करता येईल यासाठी आपण सर्वांनी एकत्रित मिळून प्रयत्न आजवर केले आहेत. याही पुढे शेतकरी बांधवांसह साखर कारखाने, यावर अवलंबुन सर्वांचा विकास कसा होईल यासाठी आणखी प्रयत्न आवश्यक आहेत असं म्हणत जिल्हा बँकेचे सर्वतोपरी सहकार्य मिळेल असे ते यावेळी म्हणाले व शेवटी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

विलास सहकारी साखर कारखाना प्रगती ही नजरेत भरणारी आमदार वैजनाथराव शिंदेमाजी आमदार वैजनाथराव शिंदे म्हणाले की, विलास सहकारी साखर कारखाना उभारण्यात आला आज याला २१ वर्ष झाले या काळात मागे वळून पाहण्याची अजिबात गरज पडली नाही याचा आज आम्हाला अभिमान तर वाटतेच त्याहीपेक्षा जास्त आनंद होतो. आज या कारखान्याची वाटचाल आणि प्रगती ही नजरेत भरणारी आहे. विलास कारखान्याने आपल्या लातूर आणि उदगीर या २ युनिटच्या माध्यमातून कारखाना क्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकजयांना चांगला भाव देणे, या भागातील तरुणांच्या हाताला काम देण्याचं काम, राज्य व देश पातळीवर मिळणारे पुरस्कार पाहता या कारखान्याच्या माध्यमातून सुरु असलेले पारदर्शक काम स्पष्ट होते. यांची वाटचाल अशीच सुरु राहावी अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना जगदीश बावणे म्हणाले की, सण १९९८ साली लातूर जिल्ह्यातील विक्रमी ऊस उत्पादन झाले आणि मांजरा सहकारी सहकारी साखर कारखान्यावर आलेला पाहता लोकनेते विलासराव देशमुख आणि सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनात संस्थापक अध्यक्ष आमदार अमित विलासराव देशमुख यांनी

कमी कालावधीत विलास सहकारी साखर कारखाना उभारुन आणि आजतागायत चांगला चालवत एक पॅटर्न निर्माण केला, असे म्हणत सर्वांचे अभिनंदन केले आणि पुढील यशस्वी कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी विक्रमी ऊस उत्पादन करणारे ऊस पुरवठादार श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख, विशाल पाटील, शिवाजीराव बावणे, महिंद्र मुळे, अरुणा मुंडे, ऊस तोडणी ठेकेदार जीवन टेकाळे, संजय राठोड, माधव स्वामी, महादेव जाधव, शिवाजी कदम, रमाकांत राठोड, बालाजी शिंदे, किशोर शिंदे, महेश पाणखडे, हार्वेस्टर ठेकेदार सतीश जाधव, महिंद्र मुळे, जीवन गवळी तर तोडणी ठेकेदार शिवाजी कदम, महादेव जाधव, रमाकांत राठोड बैलगाडी ठेकेदार शंकर गडदे, अश्रूबा बिरगड, विठ्ठल होळगीर यांच्यासह ऊस उत्पादक शेतकरी बैलगाडी ठेकेदार, ऊस तोडणी ठेकेदार, कामगारांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. ऊस उत्पादक शेतकजयांना सर्वाधिक ऊस दर दिल्याबद्दल ऊस उत्पादक शेतकजयांच्या वतीने संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख आणि चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान राज्य सहकारी बँक्स असोसिएशनचा कै. वैकुंठभाई मेहता पुरस्कार लि. पुरस्कार मिळाल्याबद्दल लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन आमदार धीरज देशमुख यांचा विलास सहकारी

साखर कारखाना लि. वैशालीनगर निवळी संचालक मंडळाच्या वतीने माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कारखान्याचे कार्यकारी संचालक संजीव देसाई यांनी सभा प्रारंभीचे वाचन केले. कारखान्याचे व्हाईस चेअरमन रवींद्र काळे यांनी अहवालाचे वाचन केले. संचालक गोविंद डुरे यांनी अनुमोदन दिले. प्रारंभी विकासरत्न विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. अहवाल सालात निधन झालेल्या विविध क्षेत्रातील मान्यवरांना दोन मिनीटे स्तब्धता पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी संचालक गोविंद बोराडे, अनंत बारबोले, भैरवनाथ सवासे, गुरूनाथ गवळी, बाळासाहेब बिडवे, नारायण पाटील, अमर मोरे, रंजीत पाटील, गोविंद डूरे, सूर्यकांत सूडे, अमृत जाधव, रामदास राऊत, सुभाष माने, भारत आदमाने, संजय पाटील खंडापूरकर, ज्ञानोबा पडीले, कार्यकारी संचालक सर्वश्री ए.आर.पवार, पी.एस.देसाई, बी.व्हि.मोरे, जी. जी.येवले,आर.बी.बरमदे तर सुभाष घोडके, सहदेव मस्के, बादल शेख, शिवाजी कांबळे यांच्यासह असंख्य मान्यवर उपस्थित होते. सुत्रसंचालन राहूल इंगळे–पाटील यांनी केले तर नारायण पाटील यांनी आभार मानले.

# जीएसटी विभागातील माहिती अधिका-यांनी - एकाच विषयावरील अर्जात २ वेगळे वेगळे निर्णय दिले अजब कारभार..

ब्रह्मण मुंबई / (वसंत उटीकर ) :- माझ्या विभागीय चौकशीच्या प्रकरणात खोटी कागदपत्रे मला आढळून आल्यामुळे, मी जीएसटी विभागातील श्री. ठाकरे, श्री. व्ही. डी. मानापुरे, श्री. डी. जी. घाटेराव, श्री. बी. व्ही. गिरी, श्री. बी. ए. वाडेकर या तत्कालीन ५ संबंधित अधिका-यांवर मुंबई हायकोर्टात क्रिमिनल रिट पेटीशन थझ/१६४०/२०१८ दाखल केलेले आहे. सदर प्रकरणात प्रथमच कोर्टात सुनावणी दिनांक २०-०९-२०२३ रोजी होणार आहे. तसेच मी माझ्या या वरील प्रकरणातील ५ तत्कालीन अधिकारी हे प्रतिवादी असल्याने व माझी कोर्टाचे कागदपत्रे संबंधित अधिका-यांवर मला बजवायचे आहे. त्यामुळे त्यांचे सध्याचे कार्यालयीन पत्ता अथवा सदर अधिकारी हे सेवानिवृत्त झालेले असतील तर त्यांच्या सध्याच्या निवासस्थानाचा कार्यालयात उपलब्ध असलेला




पत्ता मला मिळावेत. या एकमेव कारणास्तव जीएसटी भवन माझगांव कार्यालयात मी दिनांक ११.०७.२०२३ रोजीच्या अर्जाद्वारे माहितीच्या अधिकारात माहिती मागितली होती. वरील संबंधित ५ अधिका-यांपैकी श्री. बी. व्ही. गिरी या अधिका-याची माहिती ही संबंधित एका माहिती अधिका-याने मला दिनांक ३१-०७-२०२३ च्या पत्रान्वये पुरविलेली आहे. तर अन्य ४ अधिका-यांची माहिती ही ईतर ३ माहिती अधिकारी आणि ३ अपिल प्राधिकारी यांनी माहिती देण्याचे स्पष्टपणे नाकारलेली आहे.

माहितीच्या अर्जात एकाच विषयाशी संबंधित माहिती असताना जीएसटी विभागातील माहिती अधिका-यांनी व अपिल अधिका-यांनी असे २ वेगवेगळे निर्णय घेतले. अशा प्रकारे २ वेगवेगळे चुकीचे निर्णय घेता येत नाहीत.

त्यामुळे राज्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयात मी दिनांक ०८-०९-२०२३ रोजी व्दितीय अपिल अर्ज हा दाखल केलेला आहे. तसेच सदर अर्जात माहिती नाकारणा-या संबंधित ३ दोषी आढळणा-या माहिती अधिका-यावर रुपये २५,०००/- चा दंड व ३ अपिल अधिका-यांवर शिस्त भागाची कारवाई माहितीच्या अधिकारातील कलम २०(१) (२) नियमानुसार करण्यात यावी. तसेच मला या बाबीचा प्रचंड मनस्ताप सहन करावा लागलेला असल्याने माहिती अधिकारातील कलम १९ (८) (बी) नुसार मला रुपये १०,०००/- नुकसान भरपाई मिळावी, अशी विनंती अर्जात केलेली आहे. राज्य माहिती आयुक्त हे सदर प्रकरणात काय निर्णय घेतात ? ते नंतरच स्पष्ट होईलच आपला स्नेहांकित,श्री. वसंत शामराव उटीकर, सेवानिवृत्त राज्यकर निरीक्षक,भायखळा, मुंबई. भ्रमण. क्र. ९३२४५६१५९१.

# राज्यस्तरीय आयएसपी पी. जी. परिषदेत डॉ. निकिता पालकर यांना व्दितीय तर डॉ. आशुतोष अगरवाल यांना तृतीय पुरस्कार

लातूरः - इंडियन सोसायटी ऑफ पेरियोडाँटोलॉजी (खड्झ) मुंबई स्टडी ग्रुप च्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'आयएसपी इंटीग्रेट पदव्युत्तर परिषद २०२३' मध्ये लातूर येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील दंत परिवेष्ठन शास्त्र विभागातील एम. डी. एस. पदव्युत्तर अभ्यासक्रमाची विद्यार्थीनी डॉ. निकिता विकासराव पालकर व डॉ. आशुतोष राजेश अगरवाल यांनी सादर केलेल्या केस स्टडी सादरीकरणास अनुक्रमे व्दितीय व तृतीय पुरस्कार मिळाला आहे.

मुंबई येथे दि. ८ ते ९ सप्टेंबर या कालावधित संपन्न झालेल्या राज्यस्तरीय आयएसपी इंटीग्रेट पदव्युत्तर परिषदेत दंत परिवेष्ठन शास्त्र विषयातील एम. डी. एस. अभ्यासक्रमाची द्वितीय वर्षातील विद्यार्थीनी डॉ. निकीता पालकर यांनी 'डायरेक्ट सायनस लिफ्ट फॉलोड बाय इनडायरेक्ट सायनस लिफ्ट ण्ड इम्प्लांट प्लेसमेंट इन सिव्हियरली ट्रॉफिक मॅगझीला' या विषयावर सादर केलेल्या केस स्टडी सादरीकरणास व्दितीय पुरस्कार मिळाला तर डॉ. अशुतोष अगरवाल यांनी 'सॉकेट शिल्ड टेक्निक फॉर इम्प्लांट प्लेसमेंट' या विषयावर सादर केलेल्या केस स्टडी सादरीकरणास तृतीय पुरस्कार मिळाला आहे. त्याचबरोबर या अधिवेशनात एम. डी. एस. अभ्यासक्रमाची द्वितीय वर्षातील विद्यार्थीनी डॉ.




सुरभी पाटील यांनीही सहभाग नोंदवून केस स्टडी सादरीकरण केले. तसेच या परिषदेत प्रा. डॉ. ओमकुमार बघेले यांनी गेस्ट स्पीकर म्हणून मार्गदर्शन केले तर प्रा. डॉ. गौरी उगले यांनी या परिषदेत परिक्षक म्हणून काम पाहिले.

या केस स्टडी व शस्त्रक्रियेच्या कार्यासाठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विष्णुदास भंडारी, प्रा. डॉ. ओमकुमार बघेले, प्रा. डॉ. गौरी उगले, सहयोगी प्रा. डॉ. राघवेंद्र मैत्री यांनी मार्गदर्शन केले तर डॉ. प्रिया नागरगोजे, डॉ. तृप्ति गिरी, डॉ. मिथिला काकडे, डॉ. अमृता केंद्रे यांचे सहकार्य लाभले.

या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. विष्णुदास भंडारी यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन होत आहे.

# सोयाबीन खरेदी केंद्रावरील काट्यावर घोळ करणारे एडीएम अ‍ॅग्रोचे लायसन रद्द करावे

लातूर -एडीएम अ‍ॅग्रोच्या सोयाबीन खरेदी केंद्रावरील काट्यात घोळ असल्याचे समोर आले आहे. प्रतीक्विंटल मागे १२ ते १४ किलोचा फरक निघत असल्याची तक्रार लातूर जिल्ह्यातील निटूर येथील शेतकेरी नेताजी सोमवंशी यांनी केली असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे सोयाबीन खरेदी केंद्राच्या माध्यमातून शेतकर्यांच्या शेतीमालाच्या मापात पाप करणार्या सोयाबीन खरेदी केंद्रावर तत्काळ कार्यवाही करून सदरील कंपनीची परवानगी रद्द करा अशा मागणी भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी जिल्हाधिकारी व राज्याचे कृषी मंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेली एडीएम अ‍ॅग्रो या कंपनीचे जिल्ह्यात ठिकठिकाणी खरेदी केंद्र आहेत. एमआयडीसी येथे त्यांचा प्लांट आहे. २००८ पासून या कंपनीअंतर्गत सुरू असलेली सोयाबीन खरेदी केंद्र आहेत. परंतु निटूर येथील सोयाबीन खरेदी केंद्रावरील मापामध्ये पाप होऊन प्रतिक्विंटल मागे १२ ते १४ किलो सोयाबीनचा घोळ होत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या एडीएम अ‍ॅग्रो कंपनीच्या अधिकार्यांने आतापर्यंत झालेली शेतकर्यांची लूट थांबवून शेतकर्यांना नुकसान भरपाई द्यावी, अन्यथा शेतकर्यांची लूट करणार्या खरेदी केंद्रावर तत्काळ कार्यवाही करावी अशी मागणीही त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते खोरी गल्ली येथे विरंगुळा केंद्राचे भूमिपूजन



लातूर/प्रतिनिधी:शहरातील खोरी गल्ली परिसरात महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या विरंगुळा केंद्राचे भूमिपूजन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांच्या हस्ते संपन्न झाले. खोरी गल्लीतील वेद प्रतिष्ठानच्या सार्वजनिक वाचनालयाच्या जवळ हे विरंगुळा केंद्र उभारण्यात येत आहे.यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून १५ लाख रुपयांचा निधी मंजूर झालेला आहे. विरंगुळा केंद्राच्या भूमिपूजन समारंभास मनपा उपायुक्त श्रीमती मयुरा शिंदेकर,सहाय्यक आयुक्त सौ.मंजुषा गुरमे व महिला बाल विकास अधिकारी रुक्मानंद वडगावे यांच्यासह जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष आर.बी. जोशी,उपाध्यक्ष काशिनाथ सलगर,सचिव प्रकाश घादगिने यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर यांनी शहरात विरंगुळा केंद्र उभारून ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्याचा मनपाचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगितले.वृद्धांना मन रमविण्यासाठी अशी केंद्र उपयुक्त ठरतात.या माध्यमातून विचारांची देव-ाणघेवाण होऊ शकते.वृद्धांचे जीवन सुसह्य करणारा हा उपक्रम आहे.पालिकेने अशी आणखी केंद्र सुरू करावीत,अशा सूचनाही त्यांनी केल्या.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे जेष्ठ नागरिक संघाच्या वतीने स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमास डॉ. सौ.माया कुलकर्णी,आर. के.पाटील,शहाजी घाडगे,भगवानराव देशमुख,कालिदासराव देशपांडे,भारत सातपुते यांच्यासह ज्येष्ठ नागरिक संघ व वेद प्रतिष्ठानच्या सभासदांसह शहरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# श्री. सद्गुरु नागरीक सहकारी पतसंस्थेच्या वतीने चिंतनातील क्रांतीसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखक प्रा. डॉ. बळीराम गायकवाड यांचा जाहीर सत्कार...



नवी मुंबई / के. एच. हनवते :- आमचे प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य. डॉ. बळीराम गायकवाड सर, यांनी लिहिलेले चिंतना-तील क्रांतीसुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील पुस्तक मुंबई येथील एका कार्यक्रमात महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल यांच्या शुभ हस्ते प्रकाशित झाले आहे व त्या अनुषंगाने नवरत्न को. हा. सो. नेरूळ नवी मुंबई येथील रहिवाशी, आमची श्री. सद्गुरु नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून डॉ. बळीराम गायकवाड सर यांचा छोटेखानी सत्कार समारंभ आयोजित करण्यात अला होता. त्याप्रसंगी प्रा. डॉ. बळीराम गायकवाड सर यांनी लिहिलेल्या चिंतनातील क्रांतीसुर्य हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावरील पुस्तक आम्हाला भेट म्हणून दिले त्याबद्दल आम्ही प्रा. डॉ. बळीराम गायकवाड सरांचे खूप खूप धन्यवाद मानतो व त्यांना पुढील वाटचाली करिता खूप खूप शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी श्री सद्गुरू नागरिक सहकारी पतसंस्था अध्यक्ष - विरेंद्र लगाडे, खजिनदार गणेश मोठे, संस्थेच्या संचालिका सौ. मनीषा लगाडे, गव्हर्नमेंट सर्टिफाय ऑडिटर सुर्वे साहेब, ढवळे साहेब व घर हक्क संघर्ष समितीचे खजिनदार कैलास सरकटे व उद्योजक प्रज्ञेश कांबळे या सर्वांच्या उपस्थित प्रा. डॉ. बळीराम गायकवाड सर यांचा जाहीर सत्कार करण्यात अला.

# लातुरात सर्वपक्षीय ओबीसी एकवटले एकवटले ओबीसींच्या आरक्षणास धक्का लावू देणार नाही.

लातुरः-महाराष्ट्र शासनाने मराठवाड्यातील मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत अडचणी येत आहेत त्यात सुसूत्रता आणण्याच्या उद्देशाने समिती स्थापन केल्याचे दिसून येत आहे. यावरून असे दिसून येते की, सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा घाट शिंदे- फडणवीस महाराष्ट्र सरकारने घातलेला आहे.

वास्तविक पाहता महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या समितीमध्ये भारतीय प्रशासन सेवा ( ख-ड ) बजावत असलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे . या अधिकाऱ्यांनी कायदेशीर तरतुदी , विविध आयोगाचे अहवाल , सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय विचारात घेऊन अशी समिती नेमता येत नाही हे शासनाच्या निदर्शनास आणून द्यायला हवे होते . हे न करणे म्हणजे मुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळाच्या दबावाखाली येऊन संमती देणे असा प्रकार दिसतो. मात्र हा सर्वोच्च न्यायालयाचा अवमान आहे. तरीही भाप्रसे ख-ड अधिकाऱ्यांनी आतापर्यंतच्या विविध आयोगाच्या शिफारशी, हायकोर्ट व सुप्रीम कोर्टाचे निकाल व कायदेशीर बाबी लक्षात घेऊनच आपले म्हणणे राजकीय सत्तेच्या लाभार्थींना स्पष्ट सांगितले पाहिजे... ओबीसींना मिळणाऱ्या घटनात्मक लाभाचे संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधित भाप्रसे ख-ड अधिकाऱ्यांवर अधिक आहे . हे भान ठेवले नाहीतर ओबीसी समाजात असंतोष वाढीला राज्याच्या नेतृत्वाबरोबरच हे अधिकारी ही जबाबदार असतील...

विदर्भ आणि इतर महाराष्ट्राच्या काही भागातील कुणबी हा शैक्षणिक व सामाजिक मागास आहे. काकासाहेब कालेलकर आयोग व मंडल आयोग यांनी लावलेल्या कसोट्यामध्ये हा समाज पात्र ठरला होता त्यामुळे केंद्रीय ओबीसी सूचीमध्ये कुणबी समाजाला समाविष्ट करण्यात आले होते.

ओबीसी कुणबी समाज वगळून मराठा समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक मागासलेपणाची तपासणी करण्यासाठी शासनाने न्यायमूर्ती गायकवाड आयोगाची स्थापना केली होती. या आयोगाने घटनेच्या कलम १५ (४ )आणि १६ (४) अंतर्गत मराठा समाज सामाजिक आणि शैक्षणिक मागास असून त्याला पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही असा अहवाल शास-नाला दिला होता. तसेच मराठा समाजाच्या बाबतीत अपवादात्मक परिस्थिती असल्याचा निर्वाळाही या गायकवाड आयोगाने दिला होता. सदरील आयोगाच्या सर्व बाबी रद्दबातल करत सुप्रीम कोर्टाने ५ मे २०२१ रोजी मराठा समाजाला दिलेले आरक्षण रद्द केलेले आहे. त्यात महाराष्ट्रातील संपूर्ण मराठा जातीला आ-रक्षण नाकारले आहे.

तसेच याबाबतीत कुठलीही अपवादात्मक परिस्थिती नसल्याचे ही कडक शब्दात न्यायालयाने स्पष्ट केले होते. तरीही शिंदे -फडणवीस सरकार मराठवाड्यातील मराठा समाजाला ओढूनताणून ओबीसी बनवित आहे. हा कोर्टाचा अवमान आहे. सदर अध्यादेश तात्काळ रद्द करावा अन्यथा शिंदे- फडणवीस सरकारवर कोर्टाचा अवमान केल्याची केस दाखल करण्यात येईल. असा स्पष्ट इशारा यावेळी देन्यात आला.

फक्त निवडणूकीचे गणितं डोळ्यासमोर ठेवून मराठा समाजाला कुणबी समाजाशी जोडत ओबीसीमध्ये समाविष्ट करण्याचा डाव शिंदे- फडणवीस (भाजपा+ शिवसेना शिंदे गटचा) सरकारचा आहे. वास्तविक हा घटनाद्रोह व न्यायालयाचाही अवमान आहे. समग्र खऱ्या ओबीसींशी धोका आहे.

ओबीसींच्या यादीमध्ये कुठल्याही समाजाचा समावेश करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोग कार्यरत असत-ा.१५ मार्च १९९३ पासून महाराष्ट्र राज्यात न्यायमूर्ती खत्री यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्ग आयोग गठीत झाला. या आयोगासमोर सहा वेळा मराठा आरक्षणाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला या सर्व प्रकरणात मराठ्यांचा ओबीसी मध्ये समावेश करण्यास एकमताने नकार देण्यात आला. ओबीसीसाठी १९५३ मध्ये सर्वप्रथम काकासाहेब कालेलकर आयोग स्थापन झाला. काकासाहेब कालेलकर आयोगाने राज्यवार मागास जातीच्या याद्या तयार केल्या होत्या त्यात मुंबई राज्याच्या मागासांच्या यादीत क्रमांक २०६ वर कुणबी जात समाविष्ट आहे. परंतु ३६० मागास जातीच्या या यादीत मराठा समाज कुठेही नाही. मंडल आयोगाने मराठा समाजाला ओबीसी आरक्षण नाकारले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE